# सापळा केस

दिनांक ३०/१२/२०२०

आलोसे सुरेश सत्यनारायण मणीयार, कार्यालय अधिक्षक, नगर परिषद,गंगाखेड रा.देवळे जिंनीग गंगाखेड, यांनी १५००/— रू लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कारवाई.

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.परभणी येथे दि. २९.१२.२०२० रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, त्यांनी राधा कृष्णनगरी गंगाखेड येथे गट नं ३८/०६ मध्ये प्लॉट नं १७१ असे खरेदी केलेला आहे. सदर प्लॉटची नगर परिषद, गंगाखेड येथे मालमत्ता रजिस्टरला नोंदनी करावयाची आहे. त्यासाठी त्यांनी नगर परिषद गंगाखेड येथे दि. ३१/०८/२०२० रोजी अर्ज सादर केलेला आहे. सदर कामाचे संबंधाने ते वारंवार न.प.कार्यालय गंगाखेड येथे जात असून अद्याप पावेतो त्यांचे काम झाले नाही. ते दि. २९/१२/२०२० रोजी परत न.प.कार्यालय गंगाखेड येथे प्लॉटचे मालमत्ता रजिस्टरला नोंदणीचे कामासाठी गेले असता तेथील श्री.मणीयार कार्यालय अधिक्षक व श्री.नवले, लिपीक यांनी त्यांना लाचेची मागणी केली आहे त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

त्यानुसार दि ३०.१२.२०२० रोजी लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत तक्रारदार यांचे प्लॉटची नगर परिषद, गंगाखेड येथे मालमत्ता रजिस्टरला नोंदनी करण्यासाठी आलोसे सुरेश सत्यनारायण मणीयार, कार्यालय अधिक्षक, नगर परिषद,गंगाखेड यांनी १५००/— रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि. ३०.१२.२०२० रोजी तक्रारदार यांचेकडुन पंच क्र.१ यांचे समक्ष स्विकारली आहे. व नमुद आलोसे यांना स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले असुन त्यांचे विरूध्द पो.स्टे.गंगाखेड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड व श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.भरत के. हुंबे, पोना/अनिल कटारे, पोना/अनिरूध्द कुलकर्णी, पोशि/धबडगे, पोह/जहागीरदार, पोह/हनुमंते, पोह/शकील, पोना/शेख मुखीद, पोशि/चट्टे, पोशि/मुक्तार, मपोशि/सारीका टेहरे, चापोना/कदम, चापोह/चौधरी, मपोशि/दंडवते अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२—२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती कल्पना बारवकर,पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नांदेड,परिक्षेत्र नांदेड — ८८८८८४१९६५

श्री. भरत के. हुंबे, पोलीस उप अधिक्षक — ७०२१००२११०

श्री. अमोल कडु, पोलीस निरीक्षक — ८०८७०७२९९९

Scanned with CamScanner